सह संचालक, हिंदी, गुजराती व सिंधी साहित्य अकादमी गट-अ
सहायक संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय, गट-ब
कार्यक्रम अधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, गट-ब

# A

**2016**

28 एप्रिल, 2016

**CODE : QO7**

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

**प्रश्नपुस्तिका-I**

**चाळणी परीक्षा**

**एकूण प्रश्न : 50**

**वेळ : 1 ( एक ) तास**

**एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **50** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

1. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | रामजी भांगरे | (i) | पोलीस दलातील आपल्या पदाचा राजीनामा दिला |
| (b) | असिस्टंट कलेक्टर रोझ | (ii) | याने पोलीस कुमक मागवून सरकारी खजिन्याचा वेढा मोडून काढला |
| (c) | कर्नल जेल | (iii) | सर्व स्थितीचा अभ्यास करून कोळ्यांच्या कमकुवत जागा शोधल्या |
| (d) | बापू भांगरे | (iv) | याला इंग्रजांनी 1845 मध्ये पकडले |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

2. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | गोविंदभाई श्रॉफ | (i) | औरंगाबाद येथील विद्यार्थ्यांवर प्रभाव |
| (b) | पुरुषोत्तम हरी पटवर्धन | (ii) | अहमदनगर येथील सुपरिचित राजकारणी |
| (c) | अच्यूत गणेश देशपांडे | (iii) | क्रांतीकारी व राजकीय कारवायांमुळे त्यांना मुंबई इलाख्यातून हद्दपार केले होते. |
| (d) | एस्.के. वैशंपायन | (iv) | गोविंदभाई श्रॉफ यांच्या बरोबर कार्य करीत |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

3. बेल-डोंगरी हे खनिज उत्पादक क्षेत्र खालीलपैकी कोणत्या नद्यांच्या खोऱ्यात आहे ?

(1) तापी-पूर्णा खोरे (2) वर्धा-वैनगंगा खोरे

(3) गोदावरी-सिंधफना खोरे (4) भीमा-सिना खोरे

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

4. खाली दिलेल्या माहितीनुसार विचारलेल्या रेल्वे जंक्शनचे नाव ओळखा.

ह्या जंक्शनच्या पूर्वेला कुर्डुवाडी जंक्शन आहे

ह्या जंक्शनच्या पश्चिमेला पुणे जंक्शन आहे

ह्या जंक्शनच्या उत्तरेला मनमाड जंक्शन आहे

ह्या जंक्शनच्या दक्षिणेला बारामती स्टेशन आहे

सदर जंक्शनचे नाव __________ आहे.

(1) अहमदनगर (2) होटगी (3) बार्शी (4) दौंड

---

5. (a) "माहितीचा अधिकार" कायद्याअंतर्गत माहिती मिळविण्यासाठीचा अर्ज इंग्रजी किंवा हिंदी भाषेमध्ये करता येतो.

(b) माहिती मिळविण्यासाठीचा अर्ज हा ज्या क्षेत्रात करण्यात येत असेल त्या क्षेत्राच्या राज्यभाषेत लेखी स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे करता येतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) दोन्ही बरोबर आहेत (2) (b) बरोबर आहे (a) चूक आहे

(3) (a) बरोबर आहे (b) चूक आहे (4) दोन्ही (a) व (b) चूक आहेत

---

6. राज्याचा मुख्यमंत्री हा राष्ट्रपतीच्या निवडणूकीत मतदान करावयास अपात्र ठरू शकतो. जर तो -

(1) स्वत: राष्ट्रपतीपदाचा उमेदवार असेल

(2) जर त्याने राज्यविधीमंडळाच्या कनिष्ठ सभागृहात बहुमत सिद्ध केले नसेल

(3) जर तो हंगामी मुख्यमंत्री असेल

(4) तो राज्यविधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाचा सदस्य असेल

---

7. राष्ट्रपतीस सहाय्य व सल्ला देण्यासाठी एक __________ असतील व राष्ट्रपती आपली कार्ये पार पाडताना त्या सल्ल्यानुसार कृती करतील.

(1) उपराष्ट्रपती (2) सरन्यायाधिश

(3) लोकसभा व राज्यसभेचे सभापती (4) मंत्रिमंडळ आणि त्याचे प्रमुख म्हणून पंतप्रधान

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

8. **यादी ( अ )** (भारतीय राज्यघटनेतील कलमे) व **यादी ( ब )** (तरतूदी) यांची खाली दिलेल्या संकेतातून बिनचूक जोडी जुळवा.

| **यादी ( अ ) कलम क्र.** | | **यादी ( ब ) तरतूदी** | |
|---|---|---|---|
| (a) | कलम 64 | (i) | लोकसभेचा सभापती आणि उपसभापती |
| (b) | कलम 93 | (ii) | भारताचा उपराष्ट्रपती राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष |
| (c) | कलम 89 | (iii) | सभापती आणि उपसभापतीचे अधिकार व कार्ये |
| (d) | कलम 95 | (iv) | राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

---

9. टेलनेट काय आहे ?

(1) नेटवर्क ऑफ टेलीफोन
(2) टेलिव्हिजन नेटवर्क
(3) रिमोट लॉगीन
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

10. मानवी हक्क आयोगाला खालीलपैकी कुठले अधिकार आहेत ?

(1) शपथेवर साक्ष घेणे
(2) कागदपत्रांचे प्रस्तुतीकरण
(3) कुठल्याही न्यायालयातून सार्वजनिक कागदपत्रे मागविणे
(4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**11.** मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या अंतर्गत खालीलपैकी कशाची स्थापना केली जात नाही ?

(1) राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (2) राज्य मानवी हक्क आयोग

(3) राष्ट्रीय महिला आयोग (4) मानवी हक्क न्यायालये

---

**12.** खालील विधानांचा विचार करा :

(a) सन 2003 च्या 89 व्या घटनादुरुस्तीअन्वये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी दोन स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली.

(b) अनुसूचित जातींसाठीच्या राष्ट्रीय आयोगाला त्याच्याकडे येणाऱ्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत.

**योग्य** पर्याय निवडा :

(1) (a) बरोबर (b) चूक (2) (a) चूक (b) बरोबर

(3) (a) आणि (b) दोन्ही चूक (4) (a) आणि (b) दोन्ही बरोबर

---

**13.** '*स्वच्छ भारत अभियानातंर्गत*' रेल्वे मंत्रालयाने मार्च 2016 मध्ये घोषित केल्यानुसार खालीलपैकी कोणते रेल्वे स्थानक सर्वोच्च स्थानी आहे ?

(1) राजकोट (2) सोलापूर (3) सुरत (4) चंदीगड

---

**14.** खालीलपैकी कोणत्या जोड्या अयोग्य आहेत ते ओळखा.

| | **जिल्हा** | | **डोंगररांगा** |
|---|---|---|---|
| (a) | लातूर | – | बालाघाटचे डोंगर |
| (b) | यवतमाळ | – | अजिंठ्याचे डोंगर |
| (c) | नांदेड | – | नळदूर्ग डोंगर |
| (d) | बीड | - | दरेकसा डोंगर |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (b) आणि (d) (4) (c) आणि (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

15. __________ ही 102 व्या भारतीय विज्ञान काँग्रेस (इंडियन सायन्स काँग्रेस) ची मुख्य संकल्पना होती.

(1) भारतातील स्थानिक (स्वदेशी) विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान

(2) मानवी विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान

(3) समावेशक विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवे शोध

(4) भारताच्या भविष्याला आकार देण्यासाठी विज्ञान

---

16. पद्म पुरस्कारांबाबत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर नाही** ?

(1) पद्म पुरस्कारांची सुरुवात 1954 साली झाली.

(2) या पुरस्कारांची घोषणा 1978 आणि 1979 साली करण्यात आलेली नव्हती.

(3) 2016 मध्ये एकूण 112 नामवंत व्यक्तिंना पद्म पुरस्कार घोषित करण्यांत आले.

(4) 2016 मध्ये 10 पद्मविभूषण, 17 पद्मभूषण आणि 85 पद्मश्री पुरस्कारांची घोषणा झाली आहे.

---

17. निराने उत्तरेकडे तोंड करून चालायला सुरुवात केली तेव्हा तिची सावली तिच्या पश्चिमेला तिच्याशी काटकोन करत होती. पाच मिनिटांनी ती काटकोनात वळून चालायला लागली तेव्हा तिची सावली तिच्या पाठीमागे होती. आता पाच मिनिटांच्या आत तिने तिच्या कोणत्या बाजूने, किती अंशांतून वळावे म्हणजे तिची सावली तिच्या समोर येईल ?

(1) दोन काटकोन डाव्या किंवा उजव्या बाजूला

(2) एक काटकोन डाव्या किंवा उजव्या बाजूला

(3) दोन काटकोन डाव्या बाजूला

(4) एक काटकोन उजव्या बाजूला

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**18.** पुढे एक विधान दिले असून त्यापुढे (a) व (b) ही दोन गृहीतके दिली आहेत. त्या गृहीतकांचे योग्य वर्णन करणारा पर्याय निवडा.

**विधान :**

तूट भरून काढण्याच्या हेतुने सार्वजनिक वाहतुक करणाऱ्या बसेसच्या भाड्यात वाढ करणार.- व्यवस्थापनाची घोषणा

**गृहीतके :**

(a) सध्याचे बस भाडे अतिशय अल्प आहे.

(b) तूट भरून काढण्यासाठी भाडेवाढीखेरीज दुसरा पर्याय नाही.

**पर्याय :**

(1) फक्त (a) अंतर्निहित आहे.


(2) (a) व (b) दोन्हीही अंतर्निहित आहेत.

(3) फक्त (b) अंतर्निहित आहे.

(4) (a) किंवा (b) दोन्हीही अंतर्निहित नाहीत.


---


**19.** चौरस कागदाला पुढे दाखवल्यानुसार घड्या घालून नंतर गडद आकारांच्या ठिकाणी दाखवलेले भाग काढून टाकलेले आहेत. ही घडी उलगडल्यानंतर तो कागद दाखवणारा पर्याय निवडा -





त्रिकोणांची टोके चौरसाच्या मध्याशी जुळवली | तुटक रेषेवर घडी घातली | पंच केलेला आकार (सर्व घड्यानंतर)

**पर्याय :**

(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

20. 1999 सालातील फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला शनिवार होता, तर 1997 सालातील डिसेंबर महिन्याच्या तीस तारखेचा वार निवडा.

(1) मंगळवार (2) बुधवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

---

21. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाची स्थापना –

(1) चित्रपट निर्मितीचे प्रशिक्षण देण्यासाठी झाली आहे.

(2) चित्रपट निर्मितीकरिता कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी झाली आहे.

(3) चित्रपट निर्मितीसाठी लागणारे मनुष्यबळ पुरविण्यासाठी झाली आहे.

(4) चित्रिकरणासाठी लागणाऱ्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी झाली आहे.

---

22. महाराष्ट्र शासनाच्या वतीने संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कार यांच्या नावाने प्रदान केला जाणारा पुरस्कार पुढील क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी दिला जातो -

(1) हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत (2) संगीत रंगभूमी

(3) पार्श्व संगीत (4) उपशास्त्रीय आणि सुगम संगीत

---

23. महाराष्ट्र शासनाचा ज्ञानोबा – तुकाराम पुरस्कार हा –

(a) ज्ञानोबा – तुकारामांचे नामस्मरण करणाऱ्यांना दिला जातो.

(b) अखिल महाराष्ट्रातील संत साहित्याच्या अभ्यासासाठी दिला जातो.

(c) अखिल वैश्विक ज्ञान व भक्ती यांच्या अभ्यासासाठी दिला जातो.

(d) अखिल भारतीय स्तरावर संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य/वाङ्मय लिहिणाऱ्या लेखकास दिला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) (a) व (c) (3) (c) (4) (d)

---

24. सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत पद्मविभूषण श्री. काका कालेलकर यांनी –

(1) केवळ हिंदी भाषेत लेखन केले.

(2) केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेत लेखन केले.

(3) केवळ हिंदी आणि मराठी भाषेत लेखन केले.

(4) हिंदी, गुजराती आणि मराठी भाषेत लेखन केले.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**25.** कोंकणातील नाट्य कलेला उत्तेजन व संवर्धनासाठी या नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

(a) पथ नाट्य महोत्सव
(b) लावणी व नाट्य महोत्सव
(c) लोकसंगीत नाट्य महोत्सव
(d) दशावतारी नाट्य महोत्सव

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) (2) (b) व (d) (3) (a) (4) (d)

---

**26.** पद्मश्री अनंत गोपाळ शेवडे हे सुप्रसिद्ध –

(1) हिंदी साहित्यिक होते
(2) मराठी साहित्यिक होते
(3) सिंधी साहित्यिक होते
(4) वरीलपैकी एकही नाही

---

**27.** 'महाराष्ट्र' हे राज्य खालीलपैकी केंद्र शासनाच्या कोणत्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात येते ?

(1) उत्तर-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र
(2) पूर्व-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र
(3) दक्षिण सांस्कृतिक केंद्र
(4) पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र

---

**28.** सर्वसाधारणत: कोणत्याही कार्यक्रमाचे (इव्हेंट) वैशिष्ट्य म्हणजे –

(1) तो तात्कालिक असतो
(2) त्यात लोकांचा सहभाग असतो
(3) ते एक प्रथेचे/परंपरेचे/रीतीभातीचे/सोहळ्याचे दर्शन असते
(4) वरील सर्व

---

**29.** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणात क्रीडा संस्कृतीविषयक तरतुदीसंदर्भात पुढील विधान **बरोबर** आहे –

(1) क्रीडांगण म्हणून आरक्षित असलेल्या मैदानाला अन्य कोणत्याही कारणासाठी वापर न करण्याबद्दलच्या सध्याच्या तरतुदीची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल.
(2) क्रीडांगण म्हणून आरक्षण करण्यात आलेल्या मैदानांची शास्त्रीयदृष्ट्या गणती करण्यात येईल.
(3) वरील दोन्ही बरोबर
(4) वरील दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

30. "फुलवारोंकी सैर" म्हणजे –

(a) एकात्मिकतेचे प्रतिक म्हणून फुलवाल्यांची सहल

(b) एकात्मिकतेचे प्रतिक म्हणून हा उत्सव कलकत्ता येथे साजरा केला जातो.

(c) एकात्मिकतेचे प्रतिक म्हणून हा उत्सव फुलवाल्यांना घेऊन राज्यभर साजरा केला जातो.

(d) एकात्मिकतेचे प्रतिक म्हणून हा उत्सव दिल्ली येथे साजरा केला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) (b) व (c) (3) (b) (4) (d)

---

31. सिंधी अकादमीच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(a) अकादमीसाठी अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाते.

(b) अशासकीय सदस्यांकडून कार्याध्यक्षांची नियुक्ती केली जाते.

(c) कार्याध्यक्षांकडून पदसिद्ध अध्यक्षांची नियुक्ती केली जाते.

(d) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य हे अकादमीचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) व (c) (2) (a), (c) व (d) (3) (a), (b) व (d) (4) (b), (c) व (d)

---

32. कार्यक्रम व्यवस्थापन क्षेत्रातील संकल्पनांनुसार सर्वसाधारणत: खालीलप्रमाणे कार्यक्रमांची वर्गवारी करता येते –

(1) शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगम (2) संगीत, नाटक आणि नृत्य

(3) विज्ञान, कला आणि मानव्यविद्या (4) मनोरंजनात्मक, संघटनात्मक आणि वैयक्तिक

---

33. गजानन माधव मुक्तीबोध हे प्रामुख्याने ओळखले जातात ते –

(1) त्यांच्या सिंधी साहित्यातील योगदानाविषयी

(2) सिंधी आणि मराठी साहित्यातील परस्पर अनुवादासाठी

(3) हिंदी आणि मराठी साहित्यविषयक योगदानासाठी

(4) सिंधी आणि हिंदी साहित्यातील परस्पर अनुवादासाठी

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**34.** गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्काराचे पहिले मानकरी -

(1) श्री. गजानन वाटवे (2) श्रीमती आशा भोसले

(3) श्री. हृदयनाथ मंगेशकर (4) श्रीमती माणिक वर्मा

---

**35.** एलिफंटा महोत्सव कोण आयोजित करते ?

(1) एम. पी. डी. सी. (2) एम. एस. एस. आय. डी. सी.

(3) एम. टी. डी. सी. (4) एम. ई. डी.

---

**36.** खालीलपैकी कोणती संस्था 'पु.ल. युवा महोत्सव' आयोजित करते ?

(1) ललित कला अकादमी, पुणे (2) संगीत नाटक अकादमी

(3) साहित्य अकादमी (4) वरील एकही नाही

---

**37.** गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुढील क्षेत्रातील योगदानासाठी दिला जातो -

(1) मराठी चित्रपट गीत गायन (2) हिंदी चित्रपट गीत गायन

(3) संगीत अथवा गायन क्षेत्र (4) हिंदी/मराठी चित्रपट संगीत दिग्दर्शन

---

**38.** पुढीलपैकी कोणते विधान कार्यक्रम व्यवस्थापन क्षेत्रातील संकल्पनांनुसार **खरे आहे**?

(1) नियोजनाचा आराखडा लवचिक आणि तात्काळ बदल करता येईल, असा असावा.

(2) नियोजनाचा आराखडा जसा आहे तसा तंतोतंत अमलात आणला जातो.

(3) नियोजनाचा आराखडा अजिबात लवचिक असू नये.

(4) नियोजनाचा आराखडा ही आधुनिक व्यवस्थापन क्षेत्रातील नवी संकल्पना आहे.

---

**39.** पौर्वात्य देशांच्या सर्वांगीण अभ्यासासाठी विकसित करण्यात आलेली ज्ञानशाखा म्हणजे -

(1) पुरातत्व विद्या शाखा (2) पुराभिलेख शाखा

(3) प्राच्य विद्या शाखा (4) प्राचीन विद्या शाखा

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

40. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणामध्ये क्रीडा संस्कृतीसंदर्भातील ब्रीद वाक्य आहे –

(1) 'साऱ्यांसाठी सारे आणि खेळासाठी खेळ'

(2) 'साऱ्यांसाठी खेळ आणि खेळासाठी सारे'

(3) 'सारे मिळून खेळू या'

(4) 'खेळातून रंजन आणि रंजनातून खेळ'

---

41. या मान्यवरांना "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार देण्यात आलेला **नाही.**

(a) सुनिल गावस्कर

(b) डॉ. रघुनाथ माशेलकर

(c) श्रीमती. स्नेहलता देशमुख

(d) श्री. रतन टाटा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

---

42. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ हे खालील ठिकाणी संस्थापित आहे –

(a) नागपूर (b) अमरावती (c) पुणे (d) नाशिक

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) (2) (b) व (c) (3) (c) व (d) (4) यापैकी काही नाही

---

43. योग्य जोडी जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | वेस्ट झोन कल्चरल सेंटर | (i) | पटियाला |
| (b) | इस्ट झोन कल्चरल सेंटर | (ii) | हैदराबाद |
| (c) | नॉर्थ झोन कल्चरल सेंटर | (iii) | उदयपूर |
| (d) | साउथ झोन कल्चरल सेंटर | (iv) | कलकत्ता |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (iii) (2) (b) व (i) (3) (c) व (ii) (4) (d) व (iv)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

44. कार्यक्रम व्यवस्थापक (इव्हेंट मॅनेजर) हा उत्कृष्ट -

(1) वित्तीय व्यवस्थापक असणे अपेक्षित आहे.

(2) मनुष्यबळ व्यवस्थापक असणे अपेक्षित आहे.

(3) विपणन व्यवस्थापक असणे अपेक्षित आहे.

(4) वरील सर्व

---

45. ________ या मध्ये प्रदीर्घकाळ उल्लेखनीय कार्य केलेल्या कलाकारांना भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे नांवे शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.

(a) अभिनय व शास्त्रीय संगीत

(b) शास्त्रीय संगीत क्षेत्रात गायन व वादन

(c) शास्त्रीय संगीत क्षेत्रात निर्मिती व दिग्दर्शन

(d) चित्रपट क्षेत्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) वरील सर्व

---

46. माहिती या शब्दाच्या अर्थात खालीलपैकी काय समाविष्ट नाही ?

(a) दस्तऐवज (b) ज्ञापने (मेमोज) (c) आदेश (d) मॉडेल्स

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) आणि (d) (2) (b) फक्त (3) (d) फक्त (4) सर्व समाविष्ट आहेत

---

47. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणात देवदासींच्या प्रश्नासंदर्भात पुढीलप्रमाणे तरतूद आहे -

(1) देवदासींकरिता शासकीय सेवेत जागा राखून ठेवण्यात येतील.

(2) देवदासींच्या प्रश्नांसंदर्भात पुन्हा एकदा सर्वेक्षण करण्यात येईल.

(3) देवदासींच्या कलागुणांना वाव देण्यात येईल.

(4) वरीलपैकी काहीही नाही.

---

***कच्च्या कामासाठी जागा*** /*SPACE FOR ROUGH WORK*

48. राज्य सांस्कृतिक निधीमधून –

(1) राज्याच्या सर्व सांस्कृतिक योजना घेता येतात.

(2) राज्यातील कोणत्याही सांस्कृतिक योजना घेता येत नाहीत.

(3) एरव्ही केवळ शासकीय तरतूदीमधून सहजरित्या राबविता न येणाऱ्या योजना/उपक्रम या निधीमधून राबविले जातात.

(4) राज्यातील विवक्षित योजना यामधून घेता येतात.

---

49. विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने खालील क्षेत्रातील योगदानासाठी जीवन गौरव पुरस्कार दिला जातो.

(1) लावणी गायन
(2) लावणी नृत्य
(3) तमाशा कला
(4) वरीलपैकी एकही नाही

---

50. 'महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या हिंदी, सिंधी व गुजराती साहित्यासाठीच्या अकादमी त्यांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जनतेकडून देणग्या गोळा करू शकतात.' हे विधान -

(1) अगदी बरोबर आहे.
(2) अगदी चूक आहे.
(3) अर्धसत्य आहे.
(4) वरीलपैकी काहीही लागू नाही.

---

-oOo-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK